# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## घनकचरा व्यवस्थापन विभाग
### राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.-४२२००२

जा.क्र.मनपा/घ.व्य.वि./कार्या.क्र.९/३२७/२०२१ दिनांक १४/०३/२०२१

**सुधारीत आदेश**

**विषय:- कोविड-१९ (कोरोना) विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना**
**नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान मास्क न वापरणाऱ्या व्यक्तींविरूध्द र.रू.२००/-दंडात्मक कारवाई करणे.**

**संदर्भ:-** १. साथरोग अधिनियम, १८९७
२. अधिसूचना क्रमांक करोना, २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५, दिनांक १३ मार्च, २०२०.
३. भारतीय दंड संहिता कलम १८८.
४. मा.महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सी.आर.९२/डीआयएसएम.१, दिनांक ३१ मे, २०२०.
५. सामान्य प्रशासन, मनपा नाशिक यांचेकडील आदेश जा.क्र.आस्था/वशि/४३३/२०२१, हदनोि १८.०२.२०२१.
६. मा.ना.श्री.छगन भुजबळ, मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नाशिक जिल्हा यांचे अध्यक्षेतेखाली झालेली बैठक.
७. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील क्र.कक्ष/कोरोना विषाणू/५३/२०२१, दिनांक २१.०१.२०२१ अन्वयेचे आदेश.
८. आदेश जा.क्र.मनपा/घ.व्य.वि./कार्या.क्र.९/२२२/२०२१, दिनांक २२.०२.२०२१.

**प्रस्तावना:-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात दिनांक १३ मार्च, २०२० च्या अधिसूचनेनुसार, अधिसूचनेच्या दिनांकापासून साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे, त्याअर्थी, साथरोग अधिनियम, १८९७ च्या खंड २, ३ व ४ नुसार प्रदान करणेत आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासन राज्यात करोना विषाणूमुळे उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी प्रसिध्द करणेत आलेल्या नियमातील कलम १० अन्वये आयुक्त, महानगरपालिका यांना प्रदान करणेत आलेले आहे. त्यानुसार, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड-१९ आजाराच्या पार्श्वभूमीवर आवश्यक प्रतिबंधात्मक कार्यवाही करणेत येत आहे.

आणि ज्याअर्थी, कोविड-१९ सारख्या महामारीचा संसर्ग हा थुंकीच्या माध्यमातून होत असल्याचे निष्पन्न झाल्याने अतिदक्षता घेणे जनतेच्या हिताकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक आहे. त्यास्तव, साथरोग अधिनियम, १८९७ व वेळोवेळीचे शासन निर्णय, परिपत्रके, आदेश, अधिसुचना अन्वये नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी तोंडावर मास्क न वापरणाऱ्या व्यक्तींविरूध्द दंडात्मक कारवाई करणे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

आणि ज्याअर्थी, मा.महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सी.आर.९२/डीआय एसएम.१, दिनांक ३१ मे, २०२० नुसार सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान तोंडाला मास्क वापरणे बंधनकारक करणेत आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, साथरोग अधिनियम १८९७ कलम (३) मधील तरतुद व महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० मधील नियम ११ नुसार कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांनी या नियमावलीत नियमाचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) चा कलम १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील व या नियमानुसार प्राधिकृत अधिकारी उपरोक्तनुसार व वेळोवेळी शासनाने या नियमानुसार दिलेल्या सुचनांचे उल्लंघन करणाऱ्यांविरूध्द दंडनीय कारवाई करणेस सक्षम असेल असे नमुद आहे.

आणि ज्याअर्थी, आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० मधील नियम १० व ११ नुसार नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणत्याही सार्वजनिक

मागे पहा.

ठिकाणी, कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान जे नागरीक तोंडावर मास्कचा वापर करणार नाही अशा नागरीकांविरूध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ व २९० तसेच, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३०,३३,३४,४१ व कलम ५१ चे तरतुदीनुसार र.रू.१,०००/- (अक्षरी र.रू.एक हजार मात्र) दंडात्मक कारवाई करणेकामी उक्त संदर्भ क्र.८ चे आदेश पारित करणेत आलेले आहे.

तथापि, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान तोंडावर मास्कचा वापर न करणाऱ्या नागरीकांविरूध्द दंडात्मक कारवाई करीत असतांना कसुरदार व्यक्ती आर्थिक परिस्थितीमुळे र.रू.१,०००/- दंडात्मक रक्कम भरण्यास टाळाटाळ करीत असल्याचे संबंधित पथकातील मनपा अधिकारी/कर्मचारी तसेच, पोलिस खात्याकडून अभिप्राय प्राप्त होत आहेत. परिणामी, सदर दंडात्मक कारवाई करणेस अडचणी निर्माण होत आहे. तोंडावर मास्कचा वापर न करणाऱ्या नागरीकांविरूध्द दंडात्मक कारवाई करीत असतांना सदर कारवाईचा उद्देश हा महसूल गोळा करणे हा नसून, कोविड-१९ आजाराचा प्रादुर्भाव व प्रसार होऊ नये याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून अशी दंडात्मक कारवाई करणे क्रमप्राप्त ठरते. या कारवाईमुळे प्रतिबंधात्मक उपाययोजनेची व्याप्ती व परिणामकता वाढविणे हा उद्देश आहे.

त्यास्तव, वरील बाबी विचारात घेता उक्त संदर्भ क्र.८ चे आदेशातील दंडात्मक रकमेत अंशत: बदल करणे क्रमप्राप्त ठरले असून, खालील प्रमाणे सुधारीत आदेश पारित करणेत येत आहे.

**सुधारीत आदेश**

उक्त वस्तुस्थिती व उपस्थिती बाबी विचारात घेऊन मी कैलास जाधव, आयुक्त, नाशिक महानगरपालिका मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० मधील नियम १० व ११ नुसार नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान जे नागरीक तोंडावर मास्कचा वापर करणार नाही अशा नागरीकांविरूध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ व २९० तसेच, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३०,३३,३४,४१ व कलम ५१ चे तरतुदीनुसार र.रू.२००/- (अक्षरी र.रू.दोनशे मात्र) दंडात्मक कारवाई करणेकामी आदेश पारित करीत आहे.

तसेच, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान तोंडावर मास्क न वापरणाऱ्या व्यक्तींविरूध्द र.रू.२००/- (अक्षरी र.रू.दोनशे मात्र) दंडात्मक कारवाई करणेकामी विभागीय अधिकारी, पंचवटी/ ना.पुर्व /ना.रोड/ ना.पश्चिम /सातपूर/ नविन नाशिक (सिडको) विभाग यांनी नेमलेल्या पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच, पशुवैद्यकिय अधिकारी, संबंधित प्रशासकीय विभागातील विभागीय स्वच्छता निरीक्षक/स्वच्छता निरीक्षक हे त्यांच्या अधिनस्त असलेल्या विभागातील ठिकाणी उपरोक्त कारवाई करणेस सक्षम असतील.

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलिस स्टेशन प्रमुख यांनी नेमलेल्या पथकातील पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील मा.जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त असलेले महसूल अधिकारी, मंडल अधिकारी, तलाठी व नेमलेल्या पथकातील कर्मचारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात कारवाईसाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

वरील सर्व प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी यांना चलन पुस्तके व दंडाचा लेखाशिर्ष संबंधित विभागीय अधिकारी यांचेकडून वितरीत करणेत येईल. प्राधिकृत केलेले अधिकारी/कर्मचारी यांनी दर साप्ताहिक दंडाचा भरणा विभागीय अधिकारी यांचेमार्फत महानगरपालिका कोषागारात जमा करावा. पोलिस विभागाकडील दंडात्मक कारवाईतून जमा झालेल्या रकमेपैकी ५० टक्के रक्कम हि दरमहा पोलिस विभागाकडील पोलिस कल्याण निधीमध्ये जमा करणेत येईल. सदरहू आदेशाप्रमाणे अनुसरणेत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियमितपणे घनकचरा व्यवस्थापन विभाग (मुख्यालय) येथे विभागीय अधिकारी यांनी दर आठवडयास व महिन्यास सादर करावा.

16/03/2021

**(कैलास जाधव, भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

प्रत:- रवाना

१. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक
२. मा.पोलिस आयुक्त, नाशिक शहर, नाशिक
३. उपआयुक्त, गुन्हे शाखा, नाशिक शहर, नाशिक
४. सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख, मनपा, नाशिक
५. संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, मनपा, नाशिक
६. पशुवैद्यकिय अधिकारी, मनपा, नाशिक
७. सर्व विभागीय अधिकारी, मनपा, नाशिक
८. सर्व विभागीय स्वच्छता निरीक्षक, मनपा, नाशिक
९. सर्व स्वच्छता निरीक्षक, मनपा, नाशिक
१०. स्थळ प्रत